# * परिशिष्ट * ब *
## संस्थेचेज्ञापन

---

❖ **संस्थेचे नाव व पत्ता:-**

**"सोसायटी ऑफ अलाईड इमेजिंग अँड रेडिओग्राफर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र "**

**द्वारा. चेतन अण्णासाहेब शिंदे, हाऊस नं. २२३, मॅफ्को कंपनी जवळ, जानवाडी, पुणे - ४११०१६.**

*****************************************************************************************

---

❖ **संस्थेचे ध्येय व उद्देश:-**

संघटनेचे उदिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

- महाराष्ट्र राज्यासह उर्वरित सर्व राज्यातील खाजगी , सहकारी , शासकीय व निमशासकीय आरोग्य विभागामध्ये काम करत असणाऱ्या क्ष – किरण प्रवर्गातील तसेच X-RAY, CT SCAN, MRI, DSA, CATHLAB, C-ARM, PET SCAN, RADIATION THERAPY इत्यादि सर्व कर्मचारी वर्गाला संघटित करणे व एकत्रित करणे.
- क्ष किरण प्रवर्गातील सर्व कर्मचारी वर्गाला नवीन तंत्रज्ञान अवगत करून देणे
- क्ष – किरण प्रवर्गातील शैक्षणिक पात्रता समान करण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणे .
- क्ष – किरण प्रवर्गातील कर्मचारी वर्गाला काम करत असताना क्ष – किरणांमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देणे व जागरूक करणे .
- ग्रामीण भागातील क्ष – किरण प्रवर्गातील कर्मचारी वर्गाच्या अडचणी समजून घेणे व त्यांच्या अडचणींचे निरसन करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे .
- क्ष – किरण प्रवर्गातील बोगस कर्मचारी यांच्यावर आळा घालण्यासाठी प्रयत्न करणे .
- क्ष – किरण प्रवर्गातील कर्मचारी वर्गाला आर्थिक सहकार्य उपलब्ध व्हावे यासाठी पतपेढीची (पतसंस्था) स्थापना करणे .
- क्ष – किरण प्रवर्गातील कर्मचारी वर्गाचा संघटनेच्या वतीने विमा काढणे.
- क्ष – किरणांमुळे होणाऱ्या दुष्परिनामांनविषयी समाजात जनजागृती करण्यासाठी कार्यशाळा राबविणे .
- खाजगी क्षेत्रात क्ष – किरण प्रवर्गात काम करणाऱ्या रेडिओग्राफरचे किमान वेतन निश्चित करण्यासाठी प्रयत्न करणे .
- नव्याने क्ष – किरण प्रवर्गातील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनमान्य डिप्लोमा व डिग्री कोर्सेस चालू करणे.

➢ रेडिओग्राफीचे शिक्षण आणि माहिती ही , रेडिओग्राफर प्रॅक्टिशनर्स , रेडिओग्राफी शिक्षण आणि विद्यार्थी-रेडिओग्राफरसाठी आवश्यक आहे. क्लिनिकल इमेजिंग आणि रेडीएशन थेरपी सेवांमध्ये किंवा सेरेखित केलेल्या प्रॅक्टिशनर्स , व्यवस्थापक , आणि धोरण निर्मात्यांना सूचित करून क्लिनिकल सराव आणि रुग्णांच्या काळजीवर प्रभाव टाकण्याचे आमचे ध्येय / उद्दिष्ट आहे

➢ रेडियोग्राफी निदान आणि उपचारात्मक रेडियोग्राफीच्या सर्व पैलुंशी संबंधीत उच्च दर्जाचे

---

| **श्री. सुनिल भारत वायकर** | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे** | **श्री. महेंद्र रमेश भामरे** |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

क्लिनिकल , वैज्ञानिक आणि शैक्षणिक संशोधन प्रसारित करून पुराव्यावर आधारित सरावाला प्रोत्साहित करतात .

- एक्स – रे अल्ट्रासाऊंड , C.T., M.R.I. , PET CT/MRI , CATHLAB , C-ARM आणि इतर इमेजिंग पद्धती , रेडिओ -बायोलॉजी , रेडीएशन मेडिसिन , मॉलीक्युलर इमेजिंग आणि इंटरव्हें इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी आणि इतर संबंधीत उप – विशेषज्ञांसह , डायग्नोस्टिक रेडिओलॉजी आणि इमेजिंग पद्धतींच्या अभ्यासाला आणि सरावाला चालना देणे .
- सभासदांचे हित कल्याण यांचे रक्षण आणि जतन करणे .
- रेडिओलॉजी आणि मेडिकल डायग्नोस्टिक इमेजिंगशी संबंधित बाबींमध्ये सरकारी आणि इतर खाजगी संस्थांना वेळोवेळी सल्ला आणि माहिती देणे .
- पिअर – रिव्हयू केलेले शैक्षणिक साहित्य , आरोग्य धोरणांवरील माहितीपूर्ण लेख आणि रेडिओलॉजीमधील इमेजिंग संशोधन लेख प्रकाशित करून , SAIRAM चे रेडिओग्राफर्स , प्रशिक्षणार्थी , आणि इतर रेडिओलॉजिकल व्यावसायिकांना अर्थपूर्ण माहिती प्रदान करण्याचे उद्दिष्ट आहे. ह्यामुळे SAIRAM हे मानवी आरोग्य सुधारण्यासाठी आणि रुग्णांना चांगल्या सेवेच्या लाभ देण्यास नक्कीच कटिबद्ध आणि प्रयत्नशील राहील .
- प्रत्येक वर्षी १० डिसेंबर हा दिवस संघटनेचा स्थापना दिवस म्हणून (परिवर्तन दिन) साजरा करण्यात येईल.

❖ **सामाजिक व विधायकः-**

- समाजातील अनिष्ठ प्रथा व विरोधात जनजागरण करणे, अंधश्रद्धा निर्मूलन असे उपक्रमाची माहिती देणे , साक्षरता प्रसार, प्रौढ शिक्षण वर्ग सुरू करणे, पर्यावरण संतुलनासाठी सामाजिक वनीकरण, वृक्षारोपण असे उपक्रमाची माहिती देणे, श्रमदान शिबिरे, स्वच्छता मोहिमेची माहिती देणे समाजातील निराधार, असहाय, वृद्धांसाठी अत्याधुनिक सोयींनी सुसज्ज असा वृद्धाश्रम सत्संगवर्ग, ध्यानधारणा, योगा इ. उपक्रम सुरू करणे. तसेच वृद्धाश्रम सुरू करणे.
- सहली, शैक्षणिक सहली, धार्मिक सहली, एक दिवशीय तसेच मुक्कामी सहली, साहस सहली, गडकिल्ले व दुर्गभ्रमंती तसेच दुर्गसंवर्धन असे उपक्रम राबविणे. महाराष्ट्रात भारतभर , तसेच विदेशी सहलींचे आयोजन करणे .
- सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करणे.
- राष्ट्रीय सन उत्सव १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, राष्ट्रीय थोर देशभक्तांची जयंती. पुण्यतिथि, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, वगैरे सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करणे
- शासनाच्या विविध योजनाचा प्रचार व प्रसार केला जाईल व वंचिताना अशा योजनांची माहिती देण्याचा प्रयत्न केले जाईल.
- सर्वधर्म वधू वर मेळांवे दरम्यान विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करणे. तसेच वधू वर मेळव्यांचे आयोजन करणे. तसेच रेशीमगाठी कार्यक्रम आयोजित करणे.
- शहरी व ग्रामीण स्वच्छालय मोहीम राबविणे, गोशाळा चालविणे तसेच सामाजिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे.
- तसेच अनाथाश्रम, मतिमंद, दिव्यांग मुलांची शाळा सुरू करणे. लोकांना व्यवसायाचे मोफत मार्गदर्शन करणे, प्रशिक्षण देणे, गरजूंना आर्थिक सहाय्य करणे.

| श्री. सुनिल भारत वायकर | श्री. रामेश्वर नारायण वाघमारे | श्री. महेंद्र रमेश भामरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

❖ **शैक्षणिक :-**

- शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे , बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च-माध्यमिक, इंग्रजी व मराठी माध्यम महाविद्यालय, डी. एड, बी. एड, नाइट स्कूल व महाविद्यालय, अभियांत्रिकी पदवी, पदविका अभ्यासक्रम, पॅरामेडिकल, मेडिकल अभ्यासक्रम, व्यवस्थापनशास्त्राचे अभ्यासक्रम व इतर शैक्षणिक क्षेत्रातील सुरू करण्याचा प्रयत्न करणे, आयुर्वेदिक नर्सरी चालू करण्याचा प्रयत्न करणे.
- समाजातील मुला मुलींसाठी मराठी, हिन्दी, इंग्रजी इ. माध्यमातील कॉन्व्हेट, अंगणवाडी, बालवाडी, पाळणाघर, बाळसदन,बालगृहे, निवासी शाळा, अनिवासी शाळा, प्राथमिक शाळा,माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, कन्याशाळा, रात्रशाळा, शेतकरी शाळा, सैनिक शाळा सुरू करणे.
- हुशार व गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या सुरू करणे, दत्तक पालन योजनेची माहिती देणे, स्पर्धात्मक परीक्षा केंद्र काढून महत्वाच्या परीक्षेची तयारी करणे.
- महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये संस्थेच्या शाखा काढून शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे.
- विद्यार्थ्याच्या सुप्त गुणांचा विकास व कलागुणांना उत्तेजन देणे, गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना सर्वोतोपरी सहाय्य करणे, नैतिक, सामाजिक, शारीरिक, सांस्कृतिक व अध्यात्मिकदृष्ट्या विद्यार्थ्यांचा विकास करणे. प्रौढांसाठी साक्षरता वर्ग सुरू करणे, समाजातील स्त्रियांना साक्षर करणे व त्यांच्यासाठी शिक्षण वर्ग सुरू करणे.
- पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, प्री- युनिव्हर्सिटी कॉलेज, पदवी महाविद्यालये, पदव्युत्तर, कौशल्य विकास आणि इतर अभ्यासक्रमापासून मानव संसाधन विकास शैक्षणिक संस्थांना प्रोत्साहन देणे.
- जात, पंथ, वंश, धर्म किंवा भाषा याची पर्वा न करता सर्व संप्रदायांशी संबंधित गरजू व्यक्तीसाठी शाळा आणि पुनर्वसन केंद्रे चालविणे.
- शैक्षणिक उद्देशासाठी मदतीचा विस्तार करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार आणि इतर प्राधिकरणांना सहकार्य करणे.

❖ **वैदकीय व आरोग्य विषयक :-**

- आरोग्यविषयक विविध कार्यक्रमाबाबत माहिती देणे.
- कार्यक्षेत्रातील आजारी व गरीब रुग्णांना वैदकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे. विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे, उदा. रक्तदान शिबिरे, एड्स, कुटुंब नियोजन याविषयी जनजागरणाची मोहीम हाती घेणे, तसेच विविध चिकित्सा शिबिरांचे आयोजन करणे, महिला आरोग्य तपासणी केंद्र सुरू करणे, शक्य असल्यास संस्थेतर्फे रुग्णवाहिका सुरू करणे, असाध्य रोगांच्या उपचारकरिता शक्य ती सर्व वैदकीय व आर्थिक मदत करणे.
- सर्व प्रकारचे हॉस्पिटल उभारणी, तसेच वैदकीय महविद्यालये उभारणे.
- असाध्य रोगांच्या उपचारासाठी गरजूंना आर्थिक व वैदकीय मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल व रक्तदान शिबिरे आयोजित केले जातील.
- समाजामध्ये कुटुंब नियोजन, एड्स, नेत्रदान, रक्तदान, अवयव दान इ. बाबत जनजागृती केली जाईल. शक्य झाल्यास संस्थेतर्फे रुग्णवाहिका, रक्तपेढी, नेत्रपेढी सुरू केली जाईल.
- समाजातील गरीब, गरजू व दुर्बल घटकांकरिता वैदकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी दवाखाने सुरू करणे.

---

| **श्री. सुनिल भारत वायकर** | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे** | **श्री. महेंद्र रमेश भामरे** |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

❖ **कला व सांस्कृतिक विषयक:-**

- सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी, शिवजयंती, दत्तजयंती, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, महाराष्ट्र दिन तसेच थोर राष्ट्रीय नेत्यांच्या जयंती या निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.
- जूने नावाजलेले व नवोदित लेखक तसेच कवी यांच्याकडून समाजपोषक, कलात्मक लिखाण लिहून घेणे.
- सामाजिक बांदिलकी ठेऊन रंगभूमीचा विकास करणे सर्व सामान्य समाजसुधारणा चळवळीत रंगभूमीचा उपयोग करणे व विविध कलांचा प्रसार व प्रचार करण्याकरीता मार्गदर्शन करणे. विविध जाती धर्माच्या सणांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल.
- संस्थेमार्फत ढोल ताशा पथके स्थापन करण्यात येतील. तसेच संस्थेमार्फत ढोल ताशा वादनाचे प्रशिक्षण देण्यात येईल. सांस्कृतिक कार्यक्रम तसेच इतर सार्वजनिक कार्यक्रमांचे ढोल ताशांचे वादन करण्यात येईल.
- गणपती उत्सव, दुर्गादेवी उत्सव, थोर पुरुषांची जयंती निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल, जसे ढोल ताशा पथक, नृत्य स्पर्धा, गायन स्पर्धा, विविध कला, हस्तकला, चित्रकला.
- संस्थेतर्फे साहित्य, कला, क्रीडा, नृत्य, नाट्य, वादन इ. कलांचा व संवर्धन केले जाईल. समाजातील उदयोन्मुख कलाकारांना हेरून यांच्यातील सुप्त कलगुणांना वाव देण्यासाठी त्यांच्यातील कलाविष्कार सादर करण्यासाठी संस्थेतर्फे त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाईल व अशा व्यासपीठांच्या माध्यमातून कलाकारांना विविध कलांचे प्रशिक्षण दिले जाईल.
- समाजाला दिशा दाखविणाऱ्या कलाकृतींच्या प्रदर्शनासाठी कलादालने, सांस्कृतिक भवनांची स्थापना केली जाईल.

❖ **उद्योग विषयक:-**

- राष्ट्रीयकृत बँका, रेल्वे भरती इ. रोजगाराच्या संधींबाबत माहिती दिली जाईल व मार्गदर्शन केले जाईल. त्यासंबंधीच्या परीक्षांची तयारी करून घेतली जाईल. त्यासाठी एम.पी.एस.सी. आणि यु. पी. एस. सी. कोचिंग क्लासेस चालविले जातील व त्यांना मार्गदर्शन केले जाईल.
- संस्थेमार्फत रोजगार मेळाव्याचे आयोजन करणे तसेच युवकांना संधी उपलब्ध करून देण्यास मदत करणे.
- केंद्रशासन, राज्यशासन व खाजगी भरती करीता घेतल्या जाणाऱ्या परीक्षांसंदर्भात मार्गदर्शन करणे.
- तरुणांमध्ये व्यवसायिक व उद्योजक प्रवृत्ती वृद्धीगत होण्यासाठी, त्यांना स्वावलंबी व उद्योगक्षम बनविण्यासाठी यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जातील. त्यांना स्वत:चा व्यवसाय- उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान, शिक्षण, प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाईल.
- समाजातील तरुणांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेमार्फत औद्योगीक प्रशिक्षण केंद्रे सुरू केले जातील व त्यांना अशा केंद्रांमधून रोजगाराभिमुख, व्यावसायाभिमुख प्रशिक्षण दिले जाईल.
- शेतीपुरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योग, शेतकरी संस्था उभारणी व शेतकरी संस्थेच्या माध्यमातून ॲग्रो बेस्ड सर्व स्वरूपाचे उद्योग उभारणे.

---

| | | |
|---|---|---|
| **श्री. सुनिल भारत वायकर** | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे** | **श्री. महेंद्र रमेश भामरे** |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

## ❖ महिला व बालकल्याण विषयक :-

- स्त्रिया व तरुण-तरुणी यांना मार्गदर्शन करून शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे.
- महिलांना स्वावलंबी जीवन जगण्याकरीता महिलामध्ये उद्योगधंद्याची आवड निर्माण करणे, त्यासाठी हस्तकला प्रशिक्षण केंद्र चालविणे. औद्योगिक मेळावे भरविणे व याद्वारे मार्गदर्शन करणे, नोकरी विषयक मार्गदर्शन केंद्र,बाल सेविका केंद्र चालविणे तसेच स्वयंरोजगार व प्रशिक्षण केंद्र चालविणे.
- उदा :- विविध पाककला, लोणची, पापड,मसाले इत्यादी मेणबत्ती, अगरबत्ती, पेपरप्लेट, द्रोण तयार करणे, महिलांना विविध कला व छंद जोपासण्यासाठी त्यांना विविध कला कुसरीच्या कामांचे प्रशिक्षण देणे उदा :- शिवणकला, भरतकाम, लाकडी वस्तू बनविणे तसेच पेन्टिंगकला, चित्रकला, ब्युटीपार्लर, अंगणवाडी शिक्षक,नर्सिंग,संगणक प्रशिक्षण,हॉबी कोर्सेस, शिवण कला कोर्सेस इत्यादी कोर्सेस सुरू करून प्रमाणपत्र देणे.
- गृहोदयोग, युवक-युवतींच्या आर्थिक उन्नतीसाठी हातभार लावणे.
- सामान्य मुलांकरिता शिक्षण प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करणे.
- मुलांच्या कलागुणांविषयी प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे.
- महिलांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरविणे,त्यांच्या वस्तूंना विविध पातळीवर बाजारपेठ, विक्रीव्यवस्थापन उपलब्ध करून देणे, महिला मंडळामार्फत अन्नदान व अन्नसेवा सुरू करण्याकरिता केंद्र स्थापन करणे,महिला मंडळांचे, महिला बचटगटांचे सेमिनार्स मेळावे,कार्यशाळा आयोजिन करून विचारांचे, कल्पांनाचे अनुभवांचे, ज्ञानाचे आदान प्रदान केले जाईल.
- महिलांसाठी असणाऱ्या राज्य व केंद्रशासनाच्या समाजकल्याण तसेच महिला व बालविकास विभागातर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी उपक्रमांसंबंधी माहिती देणे तथा सखोल मार्गदर्शन करणे.
- महिलांना कायदेविषयक व्यवहाराची माहिती करून देणे,माहिलामध्ये खेळाची आवड निर्माण करणे व खेळांच्या शर्यती ठेवणे व राष्ट्रीय विविध योजनांची माहिती करून देणे.
- आर्थिक दुर्बल महिला, मुले, मुली विधवा व इतर समाजातील घटकांसाठी वस्तीगृहांची सोय करणे.
- आर्थिक दुर्बल व गरजू विधवा आणि घटस्फोटीत महिला व त्यांच्या मुलांसाठी शाळा कॉलेजची फी भरणे,त्यांच्या पुस्तकांसाठी आर्थिक मदत करणे. हुशार मुलींसाठी स्कॉलरशिप देणे, शैक्षणिक मार्गदर्शन करणे,शिक्षण क्षेत्रात सर्वतोपरी मदत करून त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक दर्जा उंचवण्याचा प्रयत्न करणे.
- महिलांना घरगुती उद्योग सेवा मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.
- आर्थिक दुर्बल महिला,मुले ,मुली, विधवा व इतर समाजातील घटकांसाठी वस्तीगृहांची सोय करणे.

## ❖ कृषी विषयक :-

- सामाजिक शेतकऱ्याचे जीवनमान उंचवयाचा प्रयत्न केला जाईल. कमीत कमी पाण्यावर अधिक जास्तीत-जास्त उत्पादनासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन पध्दतीचे अवलंबन करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.
- तसेच सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती. गांडूळखत प्रकल्प, कंपोस्टखत, प्रकल्प, इ बाबत मार्गदर्शन केले जाईल . सेंद्रिय शेतीचा प्रचार व प्रसार केला जाईल.
- अत्याधुनिक तंत्रज्ञान व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे गरजूंना बीज भांडवल उपलब्ध करून दिले जाईल.

---

| श्री. सुनिल भारत वायकर | श्री. रामेश्वर नारायण वाघमारे | श्री. महेंद्र रमेश भामरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

- शेतकरी मेळावे, कृषिप्रदर्शन, चर्चासत्रे, व्याख्याने, शैक्षणिक सहली इत्यादि उपक्रम आयोजित केल्या जातील. कृषि विकासासाठी, कृषि संशोधन केंद्र स्थापन केले जाईल.
- कृषि पूरक उद्योगधंद्याच्या मार्गदशांनासाठी कृषि साप्ताहिके, कृषि मासिके, प्रकाशित केले जातील. अशा प्रकाशित साहित्यातून शेतकऱ्यांना शासनाच्या ग्रामविकासाच्या सर्व प्रकारच्या योजना उदा . जलसंधारण, मृदसंधारण, ग्रामस्वच्छता अभियान, आदर्शग्राम योजना, पानी आडवा पानी जिरवा मोहीमा इत्यादीची माहिती दिली जाईल व त्याबाबात सखोल मार्गदर्शन केले जाईल.
- शेतीपुरक उद्योगधंद्याचे प्रशिक्षण दिले जाईल व मार्गदर्शन केले जाईल. शासनाच्या पशुपालन, पशुसंवर्धन प्रकल्पाविषयी मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जाईल. उदा. गोपालन, मेंढीपालन, कुकुटपालन, इमूपालन, रेशीमउदयोग, रोपवाटीक योजना, फलबाग योजना , फलबाग प्रक्रिया उद्योग, मत्स्य शेती, शेंद्रिय शेती इत्यादि.

**❖ पर्यावरण विषयक:-**

- पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जे जे आवश्यक आहे ती सर्व कार्य करणे उदा.झाडे लावणे . झाडांचे संगोपन करणे, भरण पोषण, पालन पोषण तसेच पाणी आडवा पाणी जिरवा अश्या मोहीमा राबविणे व पर्यावरणातंर्गत सर्व कार्य करणे तसेच स्वच्छ भारत अभियाना मध्ये सहभाग घेणे, प्राण्यांसाठी निवारा गृह चालविणे, प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे हौद बांधणे. प्राण्यांसाठी रुग्णालय चालविणे, प्राण्यांसाठी चारा छावण्या उभारणे.

**❖ राष्ट्रीय उत्सव :-**

- निरनिराळे राष्ट्रीय उत्सव साजरे करणे उदा. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, महाराष्ट्र दिन, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे, संस्कारवर्ग सुरू करणे, कथाकथन, वादविवाद, प्रश्नमंच, विविध स्पर्धांचे आयोजन करणे.
- गणेशोत्सव, शिवजयंती, सांभाजीराजे जयंती, नवरात्रोत्सव, रमजान ईद, बकरी ईद, मोहरम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, बौद्धपौर्णिमा, ख्रिसमस अशा विविध उत्सवानिमित्त संस्थेतर्फे सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

➢ विविध क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटविणाऱ्या व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीचा संस्थेतर्फे पुरस्कार देऊन गौरव केला जाईल. संस्थेची ध्येय व उद्दिष्ठे तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवली जातील.

**************************************************************************************

**“सोसायटी ऑफ अलाईड इमेजिंग अँड रेडिओग्राफर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ”** या संस्थेच्या नियमावलिप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळाच्या सदरहू संस्थेचा कारभार सोपविण्यात आलेला आहे. अशा कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नांवे व पत्ता, पद, वय, व्यवसाय व राष्ट्रीयतत्व पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सभासदाचे नांव व पत्ता | वय | व्यवसाय | पद | राष्ट्रीयतत्व |
|---|---|---|---|---|---|
| १. | **श्री. सुनिल भारत वायकर**<br>५७६, भैरवनाथ मंदिरा जवळ, पोस्ट. सोनारी, ता. परंडा, सोनारी, उस्मानाबाद – ४१३५०५. | ४२ | नोकरी | **अध्यक्ष** | भारतीय |

**श्री. सुनिल भारत वायकर**
अध्यक्ष

**श्री. रामेश्वर नारायण वाघमारे**
सचिव

**श्री. महेंद्र रमेश भामरे**
खजिनदार

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | **श्री. राहुल संपत मापारी**<br>मापारवाडी, मराठी शाळा, मु/पो. लोणी, ता. राहता, लोणी खुर्द, अहमदनगर – ४१३७१३. | ३९ | नोकरी | **उपाध्यक्ष** | भारतीय |
| ३. | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे**<br>एफ/एन १२ मंगलमूर्ति अपार्टमेंट, योगेश्वरी कॉलनी, पुराना जालना, जालना – ४३१२०३. | ४० | नोकरी | **सचिव** | भारतीय |
| ४. | **श्री. महेंद्र रमेश भामरे**<br>१०४, एस.एस. व्ही. पी.एस. कॉलेज रोड, प्रभात नगर देवपूर, धुळे विद्या नगरी, धुळे – ४२४००५. | ४७ | नोकरी | **खजिनदार** | भारतीय |
| ५. | **श्री. योगेश राजाराम पठाडे**<br>फ्लॅट नं.४, महालक्ष्मी एनेक्स दुर्गा नगर, पंचवटी, के. के. वाघ कॉलेज मागे, नाशिक – ४२२००३. | ३६ | नोकरी | **सह खजिनदार** | भारतीय |
| ६. | **श्री. अमोल भागवत दळवी**<br>हैद्राबाद रस्ता, प्लॉट नं. ६, देनालक्ष्मी हौसिंग सोसायटी जवळ विडी घरकुल सोला,सोलापूर नॉर्थ, सोलापूर – ४१३००५. | ४१ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| ७. | **श्री. सागर रामेश्वर जैसवाल**<br>खानदेश मिल, महावीर कॉलनी, चाळीसगाव, जळगाव – ४२४१०१. | ३२ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| ८. | **श्री. गणेश अण्णासाहेब काकडे**<br>१, साधना वैभव, स्टील फ्लोर, चेतना नगर, भगवती गॅस एजन्सी जवळ, नाशिक – ४२२००९. | ४१ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| ९. | **श्री. स्वप्नील राजकुमार गव्हाणे**<br>जगदंबा मंदिर जवळ, ४५, जंगदंबा नगर, आकाशवाणी केंद्र सोलापूर – ४१३००६. | ३४ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| १०. | **सौ. सुरभी संतोष केलशीकर**<br>रूम नं. ७९७७, बिल्डिंग नं. २००, 3rd फ्लोर, विक्रोळी(ईस्ट), टागोर नगर, कुर्ला, मुंबई – ४०००८३. | ४० | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| ११. | **श्री. नितीन नारायण सोनार**<br>सोनार नारायण मंगु, नदी जवळ, जूने पोस्ट गल्ली, शहादा, नंदुरबार – ४२५४०९. | ३६ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |

| | | |
|---|---|---|
| **श्री. सुनिल भारत वायकर** | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे** | **श्री. महेंद्र रमेश भामरे** |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२. | **श्री. विजय निवृत्ती पवार**<br>प्लॉट नं. २१, ग.नं.१४५, अलोक नगर, अय्यप्पा मंदिर सातारा परिसर, औरंगाबाद – ४३१००१. | ४९ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| १३. | **श्री. सुरज विनोद जैस्वार**<br>हाऊस नं. १३९/ए, दसरा रोड, राम कुलर चौक, न्यू शुक्रवारी, फवारा चौक, महाल स.ओ, नागपूर. | ५० | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| १४. | **श्री. समीर मुत्सफा अन्सारी**<br>ए ३ रूम नं ०५, 1st फ्लोर, ए टाइप अपार्टमेंट, सेक्टर १५, वाशी, नवी मुंबई, ठाणे – ४००७०३. | ३३ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| १५. | **श्री. महादेव नरसिंगराव येरुळे**<br>बाभळगाव रोड, आर.टी.ओ ऑफिस जवळ, महाराणा प्रताप नगर, लातूर - ४१३५१२. | ४४ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| १६. | **श्री. अतुल जिभौउ पाटील**<br>प्लॉट नं. ६९ धोंडे सो., खानदेश मील जवळ, महावीर कॉलनी, चाळीसगाव, जळगाव – ४२४१०१. | ३१ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| १७. | **श्री. संदीप तुळशीराम पाटील**<br>फ्लॅट नं. ७, लोटस ब्ल्यु अपार्टमेंट, प्लॉट – १२४, एस.एस-२/९/बी/१, मुरारी नगर, डी.ओ.पी. नगर, नाशिक – ४२२०१०. | ४० | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| १८. | **श्री. महेश जगन्नाथ वायकर**<br>१/८०९ छाया सदन, बार्शी रोड, जुन्या गॅस गोडावून मागे, तांबरी विभाग, उस्मानाबाद – ४१३५०१. | ३४ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| १९. | **श्री. सुरेन्द्रसिंग हाटेसिंग राजपूत**<br>गट नं. १९/२ प्लॉट नं. ६४, व्यंकटेश नगर मांडळ, शिरपूर, धुळे – ४२५४०५. | ३६ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| २०. | **श्री. दिगंबर शिवराम सोनवणे**<br>वावी रस्ता, मू/पो- पारेगाव बु, ता. संगमनेर, पारेगाव बुद्रुक, अहमदनगर – ४२२६११. | ४२ | नोकरी | **सदस्य** | भारतीय |
| २१. | **श्री. चेतन अण्णासाहेब शेंडे**<br>रूम नं. २२३, जनवाडी, अरुण कदम चौक, माफको कंपनी जवळ, जनवाडी, पुणे – ४११०१६. | ३० | नोकरी | **सदस्य** | भारतीय |

**श्री. सुनिल भारत वायकर**
अध्यक्ष

**श्री. रामेश्वर नारायण वाघमारे**
सचिव

**श्री. महेंद्र रमेश भामरे**
खजिनदार

आम्ही खाली सह्या करणार "**सोसायटी ऑफ अलाईड इमेजिंग अँड रेडिओग्राफर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र** " या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन "**सोसायटी ऑफ अलाईड इमेजिंग अँड रेडिओग्राफर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र** " ही संस्था दिनांक २२/०२/२०२४ रोजी स्थापन केलेली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केलेल्या आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे नांव व पत्ता | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १. | **श्री. सुनिल भारत वायकर**<br>५७६, भैरवनाथ मंदिरा जवळ, पोस्ट. सोनारी, ता. परंडा, सोनारी, उस्मानाबाद – ४१३५०५. | |
| २. | **श्री. राहुल संपत मापारी**<br>मापारवाडी, मराठी शाळा, मु/पो. लोणी, ता. राहता, लोणी खुर्द, अहमदनगर – ४१३७१३. | |
| ३. | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे**<br>एफ/एन १२ मंगलमूर्ति अपार्टमेंट, योगेश्वरी कॉलनी, पुराना जालना, जालना – ४३१२०३. | |
| ४. | **श्री. महेंद्र रमेश भामरे**<br>१०४, एस.एस. व्ही. पी.एस. कॉलेज रोड, प्रभात नगर देवपूर, धुळे विद्या नगरी, धुळे – ४२४००५. | |
| ५. | **श्री. योगेश राजाराम पठाडे**<br>फ्लॅट नं.४, महालक्ष्मी एनेक्स दुर्गा नगर, पंचवटी, के. के. वाघ कॉलेज मागे, नाशिक – ४२२००३. | |
| ६. | **श्री. अमोल भागवत दळवी**<br>हैद्राबाद रस्ता, प्लॉट नं. ६, देनालक्ष्मी हौसिंग सोसायटी जवळ विडी घरकुल सोला,सोलापूर नॉर्थ, सोलापूर – ४१३००५. | |
| ७. | **श्री. सागर रामेश्वर जैसवाल**<br>खानदेश मिल, महावीर कॉलनी, चाळीसगाव, जळगाव – ४२४१०१. | |
| ८. | **श्री. गणेश अण्णासाहेब काकडे**<br>१, साधना वैभव, स्टील फ्लोर, चेतना नगर, भगवती गॅस एजन्सी जवळ, नाशिक – ४२२००९. | |
| ९. | **श्री. स्वप्नील राजकुमार गव्हाणे**<br>जगदंबा मंदिर जवळ, ४५, जंगदंबा नगर, आकाशवाणी केंद्र सोलापूर – ४१३००६. | |
| १०. | **सौ. सुरभी संतोष केलशीकर**<br>रूम नं. ७९७७, बिल्डिंग नं. २००, 3rd फ्लोर, विक्रोळी(ईस्ट), टागोरे नगर, कुर्ला, मुंबई – ४०००८३. | |

**श्री. सुनिल भारत वायकर** — अध्यक्ष

**श्री. रामेश्वर नारायण वाघमारे** — सचिव

**श्री. महेंद्र रमेश भामरे** — खजिनदार

| | | |
|---|---|---|
| ११. | **श्री. नितीन नारायण सोनार**<br>सोनार नारायण मंगु, नदी जवळ, जूने पोस्ट गल्ली, शहादा, नंदुरबार – ४२५४०९. | |
| १२. | **श्री. विजय निवृत्ती पवार**<br>प्लॉट नं. २१, ग.नं.१४५, अलोक नगर, अय्यप्पा मंदिर सातारा परिसर, औरंगाबाद – ४३१००१. | |
| १३. | **श्री. सुरज विनोद जैस्वार**<br>हाऊस नं. १३९/ए, दसरा रोड, राम कुलर चौक, न्यू शुक्रवारी, फवारा चौक, महाल स.ओ, नागपूर. | |
| १४. | **श्री. समीर मुत्सफा अन्सारी**<br>ए ३ रूम नं ०५, 1st फ्लोर, ए टाइप अपार्टमेंट, सेक्टर १५, वाशी, नवी मुंबई, ठाणे – ४००७०३. | |
| १५. | **श्री. महादेव नरसिंगराव येरुळे**<br>बाभळगाव रोड, आर.टी.ओ ऑफिस जवळ, महाराणा प्रताप नगर, लातूर - ४१३५१२. | |
| १६. | **श्री. अतुल जिभौउ पाटील**<br>प्लॉट नं. ६९ धोंडे सो., खानदेश मील जवळ, महावीर कॉलनी, चाळीसगाव, जळगाव – ४२४१०१. | |
| १७. | **श्री. संदीप तुळशीराम पाटील**<br>फ्लॅट नं. ७, लोटस ब्ल्यु अपार्टमेंट, प्लॉट – १२४, एस.एस-२/९/बी/१, मुरारी नगर, डी.ओ.पी. नगर, नाशिक – ४२२०१०. | |
| १८. | **श्री. महेश जगन्नाथ वायकर**<br>१/८०९ छाया सदन, बार्शी रोड, जुन्या गॅस गोडावून मागे, तांबरी विभाग, उस्मानाबाद – ४१३५०१. | |
| १९. | **श्री. सुरेन्द्रसिंग हाटेसिंग राजपूत**<br>गट नं. १९/२ प्लॉट नं. ६४, व्यंकटेश नगर मांडळ, शिरपूर, धुळे – ४२५४०५. | |
| २०. | **श्री. दिगंबर शिवराम सोनवणे**<br>वावी रस्ता, मू/पो- पारेगाव बु, ता. संगमनेर, पारेगाव बुद्रुक, अहमदनगर – ४२२६११. | |
| २१. | **श्री. चेतन अण्णासाहेब शेंडे**<br>रूम नं. २२३, जनवाडी, अरुण कदम चौक, माफको कंपनी जवळ, जनवाडी, पुणे – ४११०१६. | |

**वरील सर्व इसमांना मी ओळखत असून त्यांनी माझे समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत त्या मी ओळखतो.**

स्थळ :- पुणे

दिनांक :- २२/०२/२०२४

**श्री. सुनिल भारत वायकर**
अध्यक्ष

**श्री. रामेश्वर नारायण वाघमारे**
सचिव

**श्री. महेंद्र रमेश भामरे**
खजिनदार

## * प्रमाणपत्र *

यावरून असे प्रमाणित करण्यात येते की **“सोसायटी ऑफ अलाईड इमेजिंग अँड रेडिओग्राफर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ”** या नावाची अथवा या नावात साम्य असलेली दुसरी कोणतेही संस्था आमचे उत्तम माहितीप्रमाणे व समजुतीनुसार या भागात किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था नोंदविण्यात आलेली नाही.

स्थळ :- पुणे

दिनांक :- २२/०२/२०२४

| | | |
|---|---|---|
| **श्री. सुनिल भारत वायकर** | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे** | **श्री. महेंद्र रमेश भामरे** |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

# * परिशिष्ट * क *

संस्थेचे नियम व नियमावली ( घटना )

---

❖ **संस्थेचे नाव व पत्ता:-**

**"सोसायटी ऑफ अलाईड इमेजिंग अँड रेडिओग्राफर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र "**

**द्वारा. चेतन अण्णासाहेब शिंदे, हाऊस नं. २२३, मॅफ्को कंपनी जवळ, जानवाडी, पुणे - ४११०१६.**

***********************************************************************************

❖ **नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या :-**

अ) **संस्था :-** संस्था म्हणजे संस्था नोंदणी कायदा सन १८६० व मु. सा. वि. व्य. कायदा सन १९५० अन्वये नोंदविण्यात येणारी "**सोसायटी ऑफ अलाईड इमेजिंग अँड रेडिओग्राफर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र** ", या नावाची संस्था.

ब) **नियम :-** संस्था नोंदणी अधिनियम मु. सा. वि. व्य. महाराष्ट्र १८६० कायदे व संस्था नोंदविण्यात येताना कार्यकारी मंडळाने तयार केलेले नियम व नियमावली.

क) **कार्यकारी मंडळ :-** संस्थेचे कार्यकारी मंडळ म्हणजे संस्थेच्या नियम व नियामावलीनुसार संस्था स्थापनेच्यावेळी असणारे व नंतर संस्थेच्या घटनेनुसार दर ____वर्षानी संस्थेच्या सर्वसाधारण सभेत निवडून येणारे मंडळ किंवा विश्वस्त की, ज्यांचेवर संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपविली आहे.अशा कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, सदस्य व अन्य आवश्यक असल्यास इतर पदे प्रामुख्याने असतील.

ड) **सदस्य :-** संस्थेचे नियम व नियमावली मान्य असणारी व कार्यकारी मंडळाने प्रवेश दिलेली, वर्गणी भरणारी व्यक्ती संस्थेचे सभासद म्हणून संबोधण्यात येईल. महाराष्ट्र राज्यासह उर्वरित सर्व राज्यातील खाजगी, सहकारी, शासकीय व निमशासकीय विभागातील क्ष-किरण प्रवर्गातील सर्व कर्मचारी या संघटनेचे सभासद होऊ शकतात. सभासद होण्यासाठी रु. ५०० /-(पाचशे रुपये) एवढी फी भरून या संघटनेचे आजीवन सभासद होता येईल. या फिसमध्ये वेळेनुसार बदल करण्याचा अधिकार संघटनेच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांना राहील. पूर्वीपासून सदस्य असणाऱ्या सभासदास वाढीव फी आकारली जाणार नाही.

ई) **अनुसूची :-** या नियमावली सोबत जोडलेल्या स्वतंत्र अशा अनुसूची १, २, ६, की ज्या सन

---

| | | |
|---|---|---|
| **श्री. सुनिल भारत वायकर** | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे** | **श्री. महेंद्र रमेश भामरे** |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

१९७१ च्या संस्था नोंदणी महाराष्ट्राचे नियमाप्रमाणे आहेत.

**फ)** **उद्देश :-** विधानपत्रात नमूद केलेले उद्देश की ज्या करीता स्थापन करण्यात येत आहे असे उद्देश.

❖ **कार्यक्षेत्र** :- संस्थेचे कार्यक्षेत्र ही संपूर्ण महाराष्ट्र असे राहील.

❖ **हिशोबाचे वर्ष** :- **संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.**

❖ **सदस्यांची नोंदवही** :-

संघटना आपल्या सर्व सदस्यांची नावे, त्यांच्या कार्याचे व राहण्याचे ठिकाण, संपर्क क्रमांक इत्यादि, तपशिलासह सदस्यांची नोंदवाही ठेवेल, तसेच ही सर्व माहिती संगणीकृत करून जतन करून ठेवली. जाईल. यासाठी जिल्ह्यांच्या सदस्यांची नोंदवही जिल्हास्तरावर राहील व त्याचे अद्यावत ठेवण्याचे कार्य जिल्हा सचिव करतील. तसेच राज्य स्तरावरील राज्यातील संपूर्ण सदस्यांची नोंदवाहि अद्ययावत व सांगणीकृत करून जतन करण्याची जबाबदारी राज्य – सरचिटणीस यांची असेल.

❖ **सभासदांचे आंतरजिल्हा हस्तांतरण** :-

संघटनेचा एखादा सदस्य बदली झाल्याने अथवा एका जिल्ह्यातून इतर जिल्ह्यात स्थलांतरित झाल्यास अशा सदस्यांनी त्यांचे सदस्यत्व इतर जिल्ह्यात स्थलांतरित करणेची विनंती केल्यास जिल्हा कार्यकारणी यांनी स्थलांतरित करत असलेल्या जिल्हा कार्यकारिणीची चर्चा करून ना हरकत प्रमाणपत्र (NOC) देऊन सदस्यत्व स्थलांतर करता येईल. सदर बाबत कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. ना हरकत प्रमाणपत्राची प्रत राज्य संघटनेला देऊन संबंधित दोन्ही जिल्ह्याने सदस्य नोंदवहीत झालेल्या बदलाची योग्य ती नोंद घेणे बंधनकारक राहील.

❖ **पदाधिकारी** :-

**अ)** **राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळ :-** संघटनेत अध्यक्ष- ०१ पद, उपाध्यक्ष-०१, पद, सचिव-०१ पद, सहसचिव-०१ पद, खजिनदार-०१ पद, सदस्य-१६ पदे असे एकूण २१ सदस्यांची राज्यस्तरीय कमिटी असेल. या कमिटीवरील सदस्यांची निवड लोकशाही पद्धतीने प्रत्येक ___ वर्षाला होईल.

**ब)** **विभागीय पदाधिकारी :-** राज्यातील प्रत्येक विभागातील कामकाज सोयीचे व्हावे यासाठी राज्यस्तरीय कमिटी मार्फत विभागीय कमिटीची स्थापना केली जाईल ज्यात विभागीय सचिव व सहसचिव असे ०२ पदे असतील. या विभागीय कमिटी मध्ये त्या विभागात येणाऱ्या जिल्ह्यातून नावे मागवली जातील व त्यातून बहुमताने एका सदस्याची विभागीय सचिव व एकाची सहसचिव म्हणून निवड केली जाईल.

क) **जिल्हास्तरीय संघटनात्मक रचना** :- प्रत्येक जिल्ह्यातील कामकाज सोयीचे व्हावे या दृष्टीने राज्यस्तरीय कार्यकारी मंडळ प्रत्येक जिल्ह्यात आपल्या शाखा सुरू करेल. जिल्हास्तरीय कामकाज पाहण्यासाठी जिल्हाध्यक्ष-०१ पद, खजिनदार-०१ पद असे ०५ पदाधिकारी व ०४ नियुक्त सदस्य अशी ०९ पदाधिकाऱ्यांची जिल्हा कार्यकारिणीवर निवड करण्यात येईल. जिल्हा कार्यकारणीतील ०५ पदाधिकारी यांची निवड प्रत्येक ०३ वर्षांनी लोकशाही पद्धतीने होईल. व उर्वरित ०४ सदस्यांची निवड जिल्हा कार्यकारणी करेल. जिल्हा कार्यकारणी **शहरप्रमुख, जिल्हा संपर्कप्रमुख** म्हणून प्रत्येकी ०१ पद सर्वानुमते ठरवू शकते. जिल्हा स्तरीय कमिटी स्थापन करण्यापूर्वी जिल्ह्यास्तरावरील रेडीओग्राफर्स यांना राज्य पदाधिकारी मंडळाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

---

| श्री. सुनिल भारत वायकर | श्री. रामेश्वर नारायण वाघमारे | श्री. महेंद्र रमेश भामरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

ड) **तालुकस्तरीय संघटनात्मक रचना :-** प्रत्येक तालुक्यातील कामकाज सोयीचे व्हावे या दृष्टीने जिल्हास्तरीय कार्यकारी मंडळ प्रत्येक तालुक्यात आपल्या शाखा सुरू करेल. तालुकास्तरीय कामकाज पाहण्यासाठी तालुकाध्यक्ष-०१ पद, उपाध्यक्ष-०१ पद, सचिव-०१ पद, खजिनदार-०१ पद, सदस्य-३ पदे, अशी एकूण ०७ सदस्सीय तालुका कार्यकारणी असेल. तालुका कार्यकारणीची निवड जिल्हा अध्यक्ष व तालुका स्तरावरील सदस्य चर्चेतून घेतील.

❖ **राज्यस्तरीय शैक्षणिक कमिटी** :-

क्ष – किरण विभागात काम करणाऱ्या प्रत्येक सदस्याला संबंधित क्षेत्रातील शैक्षणिक माहिती उपलब्ध करून देण्यासाठी या समितीची स्थापना राज्य कार्यकारी मंडळ करेल. या समितीमध्ये अध्यक्ष-०१ पद, उपाध्यक्ष-०१ पद, सचिव-०१ पद, सदस्य-०२ असे एकूण ०५ सदस्य असतील.

❖ **राज्यस्तरीय कल्याण समिती** :-

क्ष – किरण विभागात काम करणाऱ्या सदस्यांच्या हितासाठी ही समिती काम करेल. या समितीमध्ये अध्यक्ष-०१ पद, उपाध्यक्ष-०१ पद, सचिव-०१ पद, सदस्य-०२ असे एकूण ०५ सदस्य असतील.

❖ **राज्यस्तरीय क्रीडा समिती** :-

क्ष – किरण आणि क्ष-किरणसंबंधित विभागात काम करणाऱ्या सदस्यांच्या अवगत असलेल्या क्रीडा प्रकारात त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही कमिटी काम करेल. या समितीमध्ये अध्यक्ष-०१ पद, उपाध्यक्ष-०१ पद, सचिव-०१ पद, सदस्य-०२ असे एकूण ०५ सदस्य असतील.

❖ **राज्यस्तरीय कायदेशीर सल्लागार समिती** :-

संघटनेला संघटनेच्या हितासाठीचे निर्णय घेण्यासाठी योग्य मार्गदर्शन करण्याचे काम ही कमिटी करेल. या समितीमध्ये अध्यक्ष-०१ पद, उपाध्यक्ष-०१ पद, सचिव-०१ पद, सदस्य-०२ असे एकूण ०५ सदस्य असतील.

❖ **राज्यस्तरीय कार्यकारी मंडळ** :-

राज्यस्तरीय कार्यकारी मंडळ : राज्यस्तरीय कार्यकारी मंडळ पदाधिकारी अधिक व्यापक असून त्यांची रचना खालील प्रमाणे राहतील. त्यात खालील घटकांचा समावेश असेल.

**अ)** राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळाचे सर्व सभासद कार्यकारी मंडळाचे सभासद राहतील.
**आ)** प्रत्येक विभागाचे सचिव व सहसचिव हे कार्यकारी मंडळाचे सभासद असतील.
**इ)** प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष व सचिव हे कार्यकारी मंडळाचे सभासद असतील.
**ई)** प्रत्येक तालुक्याचे अध्यक्ष हे कार्यकारी मंडळाचे सभासद असतील.
उ) राज्यस्तरीय शैक्षणिक कमिटी, कल्याण समिती क्रीडा समिती, व कायदेशीर सल्लागार समितीमध्ये सर्व सदस्य हे कार्यकारी मंडळाचे सभासद असतील.
ऊ) संघटनेचे स्थापनेच्या वेळेस चे सर्व पदाधिकारी व सदस्य हे संघटना विसर्जित होईपर्यंत राज्यस्तरीय कार्यकारी मंडळाचे सभासद असतील.

❖ **रिक्त पदे भरणे आणि पदावरून काढून टाकणे** :-

खालील कारणास्तव सभासदांचे सभासदत्व रद्द होईल.

१. सभासद दिवंगत झाल्यास किंवा त्यांनी लेखी राजीनामा संस्थेच्या पदाधिकारी यांच्याकडे सादर केल्यास व तो कार्यकारी मंडळांनी मंजूर केल्यास.

२. संघटनेचा कुठलाही पदाधिकारी फौजदारी खटल्यात दोषी किंवा कायदेशीर शिक्षेस पात्र

---

| | | |
|---|---|---|
| **श्री. सुनिल भारत वायकर** | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे** | **श्री. महेंद्र रमेश भामरे** |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

ठरल्यास त्याचे सदस्यत्व रद्द केले जाईल.

३. कुठलाही पदधिकारी शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या संस्थेचे काम करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला राज्यस्तरीय मंडळाची मीटिंग घेऊन त्याला पदावरून मुक्त केले जाईल.

४. सभासदाची / पदाधिकारी यांची वर्तवणूक / वागवणूक संस्थेच्या कार्यास घातक ठरत असेल ज्ञापन, नियम व नियमावली मधील तरतुदींचे उलंघन करणारी असेल किंवा संस्थेस नुकसान पोहोचवणार असेल तर अशा सभासदांचे सभासदत्व कार्यकारी मंडळ यांच्या शिफारशीवरुन वार्षिक सर्वसाधारण सभेत रद्द करण्यात येईल परंतु तत्पूर्वी अशा सभासदास त्यांचे मत सभेत मांडण्याची एक संधी देण्यात येईल व याबाबतचा वार्षिक सर्वसाधारण सभेत घेतलेला निर्णय हा अंतिम आणि निर्णयक असेल.

५. संघटना नियम, SOPs, व ठरविलेले नियमांचे पालन न करणे, आर्थिक नुकसान करणे, भ्रष्टाचार करणे, असंवैधानिक कार्य करणे तसेच लबाडी करणाऱ्या किंवा संघटनेच्या हिताला बाधक ठरेल अशी कृती करणाऱ्या कोणत्याही पदाधिकाऱ्याला राज्य कार्यकारी मंडळ हे बहुमताने काढून टाकेल, त्याचे सदस्यत्व रद्द करेल व गरज भासल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच केलेली कार्यवाही ही वार्षिक सर्वसाधारण सभेत तीन चतुर्थांश सदस्यांच्या मताधिक्याने मंजूर करून घेण्यात येईल. अशा सदस्यांचे सदस्यत्व शुल्क परत केले जाणार नाही.

❖ **<u>संघटनेच्या सभा</u> :-**

सचिव, अध्यक्ष व इतर राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळाशी विचार विनिमय करून निश्चित करतील अशा खालील सभा घेण्यात येतील.

१. **<u>वार्षिक सर्वसाधारण सभा</u>** :-

वार्षिक सर्वसाधारण सभा ही वर्षातून एकदा घेतली जाईल. या सभेत राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळाचे २१ सदस्य, प्रत्येक विभागाचे सचिव व सहसचिव असे १२ सदस्य, प्रत्येक जिल्ह्याचे जिल्ह्याध्यक्ष व सचिव व प्रत्येक तालुक्याचे तालुका अध्यक्ष, शैक्षणिक, क्रीडा, कल्याण व कायदेशीर सल्लागार समितीचे अध्यक्ष असे पदाधिकारी उपस्थित असतील.

२. **<u>त्रैमासिक सभा</u> :-**

ही सभा प्रत्येक तीन महिन्याला घेण्यात येईल. या सभेस सर्व राज्यस्तरीय पदाधिकारी, सर्व विभागीय सचिव, सर्व जिल्हाध्यक्ष किंवा सचिव यापैकी किमान एक सदस्य, शैक्षणिक,क्रीडा, कल्याण व कायदेशीर सल्लागार समितीचे अध्यक्ष असे पदाधिकारी उपस्थित असतील. संघटनेच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांश सदस्यांनी मागणी केल्यानंतर विशेष सभा बोलवण्यात येईल. अशी मागणी आल्यास २० दिवसाच्या आत सभा बोलवावी लागेल. जर अध्यक्षांनी किंवा सचिवानी अशी विशेष सभा बोलवण्यास कसूर केला तर सभेची मागणी करणारे सदस्य स्वत:हून अशी सभा एक महिन्याची नोटीस पदाधिकारी मंडळास दिल्यानंतर बोलवतील आणि त्या सभेतील कामकाज संघटनेवर बंधनकारक राहील.

३. **<u>संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन</u> :-**

संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन वर्षातून एकदा घेतले जाईल. या अधिवेशनास संघटनेचे सर्व पदाधिकारी व सर्व सदस्य उपस्थित असतील.

---

| श्री. सुनिल भारत वायकर | श्री. रामेश्वर नारायण वाघमारे | श्री. महेंद्र रमेश भामरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

❖ **आयोजित करण्यात येणाऱ्या सभेत पुढील कामकाज करण्यात येईल** :-

अ) संघटनेने केलेल्या कामांचा अहवाल व खजिनदार व अंतर्गत लेखापरीक्षकांनी सादर केलेला अहवाल तपासून त्यास स्वीकृती देणे.

आ) संघटनेच्या भविष्यातील धोरणांची कार्यपद्धती ठरविणे.

इ) अध्यक्षांच्या परवानगीने सभेसमोर ठेवण्यात येणारे इतर कामकाज करणे, वेळेवर उपस्थित होणाऱ्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

ई) जिल्हा कार्यकारिणीच्या कामांचा अहवाल व केलेले कार्य याचा आढावा घेणे.

❖ **गणपूर्ती** :-

संघटनेच्या सर्व सभांसाठी किमान एक तृतीयांश सदस्यांची उपस्थिती असणे आवश्यक असेल. गणपूर्ती होत नसेल तर अर्ध तास प्रलंबित ठेऊन परत सभा सुरू करण्यात येईल. या वेळेस घेतलेल्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

**क्रमश:** २ सभेस गैरहजर राहणाऱ्या पदाधिकाऱ्यास, संघटनेचे काम करण्यास रस नाही किंवा तो पदाधिकारी संघटनेचे कामकाज करण्यास असमर्थ आहे असे गृहीत धरून त्यास पदावरून कमी करण्याचा अधिकार राज्य पदाधिकाऱ्यांना असेल.

❖ **राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांची कर्तव्ये**:-

अ) **अध्यक्ष** :-

अध्यक्ष संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या व पदाधिकारी मंडळाच्या सर्व सभांचे अध्यक्ष असतील. त्या सभांमध्ये सुव्यवस्था ठेवतील, सर्व कार्यवृतांवर सह्या करतील आणि त्यांना फक्त निर्णायक मत देण्याची परवानगी असेल. आवश्यक असेल तेव्हा कार्यकारी मंडळ किंवा संघटनेची विशेष सभा बोलवण्याचे अधिकार अध्यक्षांना असतील. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष, सचिव,सहसचिव, खजिनदार हे अनुक्रमे उपस्थिती प्रमाणे अध्यक्षपद भूषवतील.

आ) **उपाध्यक्ष** :-

अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षांचे सर्व कार्य पार पाडण्याची जाबबदरी उपाध्यक्षांची असेल.

इ) **सचिव** :-

सचिव हे संघटनेच्या व समित्यांच्या सर्व सभेचे इतिवृत्त लिहितील व सर्व कार्यलयीन कामकाज सांभाळतील. सर्व सभा बोलावतील, अध्यक्षांशी विचार विनिमय करून वेळोवेळी येणारे काम पर पाडतील.

ई) **कोषाध्यक्ष ( खजिनदार )** :-

कोषाध्यक्ष हे सर्व खर्चाचा अचूक हिशोब ठेवतील तसेच दरवर्षी जमा-खर्चाची प्रत्येक बाब स्पष्ट दर्शविणारा ताळेबंद तयार करतील. संघटनेमध्ये वेळोवेळी भरणा केलेल्या रकमा योग्यरीतीने सुरक्षित ठेवण्याकरता ते जबाबदार राहतील. ते पदाधिकारी मंडळाने मंजूर केलेल्या सर्व खर्चासाठी रकमा प्रदान करतील. वित्तीय SOP अनुसार कोषाध्यक्ष कार्य करतील.

---

| श्री. सुनिल भारत वायकर | श्री. रामेश्वर नारायण वाघमारे | श्री. महेंद्र रमेश भामरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

उ) **सहकोषाध्यक्ष (सहखजिनदार) :-**

सहकोषाध्यक्ष हे कोषाध्यक्ष यांना त्यांच्या कामात संपूर्ण सहकार्य करतील व त्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे सर्व कामकाज पाहतील.

ऊ ) **अंतर्गत लेखापरीक्षक :-**

कोषाध्यक्ष यांनी केलेल्या कामकाजाचा, त्यासोबतच जिल्हा कार्यकारणीच्या आर्थिक कामकाजाचा सखोल अभ्यास करतील व त्या कामास मंजुरी देतील. अंतर्गत लेखापरीक्षकांनी मंजुरी दिल्याशिवाय कोणत्याही आर्थिक कामकाजाचा अहवाल ग्राह्य धरला धरला जाणार नाही .

राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळातील बाकी सदस्य हे सर्व पदाधिकार्यांना सर्वतोपरी सहकार्य करतील.

१. **विभागीय सचिव :-**

विभागीय सचिव हे त्यांच्या विभागात येणाऱ्या सर्व जिल्ह्यात संघटना मजबूत करण्याचे काम करतील. ज्या जिल्ह्यात शाखा नाही त्या ठिकाणी जाऊन तेथील क्ष-किरण बांधवाना संघटनेचे महत्व पटवून देतील. संघटनेचे उदिद्ष्टे समजून सांगतील व त्या जिल्ह्यात संघटनेची शाखा सुरू करतील .

विभागात येणाऱ्या सर्व जिल्ह्यांच्या पदाधिकार्यांसोबत संपर्कात राहून त्यांचे अहवाल, त्यांच्या अडचणी व इतर सर्व कामकाजाची माहिती राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळाकडे सादर करतील विभागीय सचिव हे त्यांच्या विभागात येणाऱ्या सर्व जिल्हयांचे व राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळ यांचे मधील **समन्वयक** म्हणून कार्य करतील.

२. **विभागीय सहसचिव :-**

विभागीय सहसचिव हे विभागीय सचिवांना सर्वोतोपरी त्यांच्या कार्यात मदत करतील त्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे सर्व कामकाज पाहतील.

३. **जिल्हाध्यक्ष :-**

जिल्हाध्यक्ष हे आपापल्या जिल्ह्यात संघटना मजबूत करण्याचा प्रयत्न करतील . जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात संघटनेची शाखा सुरू करतील . संघटनेच्या जिल्हास्तरावर होणाऱ्या सर्व कामकाजावर नियंत्रण ठेवतील व जिल्हास्तारवरील सर्व कामकाजाचा अहवाल विभागीय सचिवांकडे सादर करतील . विभागीय सचिवांच्या सूचनेप्रमाणे जिल्हाध्यक्ष काम करतील . बाकीचे जिल्हा पदाधिकारी त्यांच्या पदानुसार कामकाज पाहतील .

❖ **सर्वसाधारण निधी :-**

सर्वसाधारण निधी मध्ये सदस्यनोंदणी शुल्क, वैयक्तिक सभासदांनी दिलेली वर्गणी, सभासदांना व्यतिरिक्त इतर कोणी दिलेली वर्गणी, शासकीय, निमशासकीय, सहकारी, खाजगी संस्थेकडून दिल्या जाणाऱ्या निधीचा समावेश असेल . सदरील रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेत संघटनेच्या नावाने खाते काढून त्यात ठेवण्यात येईल . संबंधित खात्याचा व्यवहार अध्यक्ष , सचिव आणि कोषध्यक्ष किंवा त्यांनी मनोगीत केलेल्या सदस्यपैकी दोघांच्या स्वाक्षरीने सांभाळला जाईल. कोषाध्यक्ष दैनंदिन खर्चासाठी त्यांच्या जवळ रुपये १९००० / एवढी रक्कम नगद स्वरूपात ठेऊ शकतात, त्यापेक्षा जास्त रक्कम कोषाध्यक्ष यांना नगद स्वरूपात जवळ ठेवता येणार नाही. सदरील नगद स्वरूपातील रक्कम खर्च करण्यापूर्वी कोषाध्यक्ष यांना अध्यक्ष व सचिव यांना लेखी निवेदन द्यावे

| | | |
|---|---|---|
| **श्री. सुनिल भारत वायकर** | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे** | **श्री. महेंद्र रमेश भामरे** |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

लागेल .

जिल्हा कार्यकारणीला सामान्य लेखन सामग्री, त्रैमासिक व मासिक बैठक, संघटनावाढीसाठी केलेल्या प्रवासाचे भत्ते व आकस्मित खर्चासाठी वार्षिक रुपये १०००० /- खर्चासाठी दिले जातील. या रकमेपेक्षा जास्त खर्च होणे अपेक्षित असेल तर त्यासाठी राज्य कार्यकरिणीला लेखी स्वरूपात खर्चाचा अहवाल सादर करून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील .

**अ )** संघटनेच्या कोषाचे योग्यप्रकारे विनियोजन राहण्यासाठी निधीसंबंधी स्वतंत्र नियमावली (Standing Operating Procedure (SOP) . , राज्य कार्य बैठकीमध्ये तयार करण्यात येईल . जेणे करून राज्य कोषाध्यक्ष / जिल्हा कोषाध्यक्ष यांना कोषसंबंधी व्यवहार करणे सुरळीत होईल .

**आ )** राज्य संघटनेचे कोषाचे बँक खाते हे राष्ट्रीयकृत बँकेतच काढले जाईल . जिल्हास्तरीय संघटनेचे खाते सुद्धा राष्ट्रीयकृत बँकेतच ( ज्या बँकेत राज्य संघटनेचे खाते आहे त्याच बँकेत काढण्यात येईल, जेणेकरून वार्षिक ताळेबंद सादर करताना सोयीस्कर होईल . जिल्हा स्तरावर बँक खाते उघडण्यापूर्वी राज्य स्तरावरून ना – हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील. तथापि जिल्हा कार्यकर्णीचे घटनात्मक कोरम पूर्ण झाल्याशिवाय जिल्हा स्तरावर बँक खाते उघडण्याची परवानगी देण्यात येणार नाही. संघटनेचे बँक खाते उघडतान जिल्हा अध्यक्ष , सचिव / कोषाध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने, ना-हरकत प्रमानपत्रात नमूद केलेल्या नावाने खाते उघडण्यात यावे . ज्या पदाधिकारी यांना राज्य संघटनेचे व जिल्हा स्तरावरील खाते हाताळण्याची अनुमति दिली आहे अशा सदस्यांची अनुमति रद्द करण्याची व त्यांच्या जागी नवीन पदाधिकारी यांची नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य कार्यकारणीस राहिल.

**खालील कामांसाठी सर्वसाधारण निधीतून खर्च करण्यात येईल .**
**संघटनेचा** सर्वसाधारण निधी खालील गोष्टींसाठी खर्च करण्यात येईल :

**अ)** संघटनेच्या पदाधिकारी यांचे संघटनेचा कामासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासासाठी भत्ता , निवणूक प्रक्रियेचा खर्च , बैठकांसाठी लागणारा खर्च , सर्वसाधारण सभेचा खर्च , अधिवेशनाचा खर्च , शैक्षणिक कार्यशाळ ( Conference )साठी लागणारा खर्च इत्यादि.

**आ)** लेखा परीक्षणास लागणारा खर्च करणे .

**इ)** ज्या कोणत्याही विधी कार्यवाहित संघटना पक्षकार असेल अशा कार्यवहीमध्ये खटला किंवा बचाव संघटनेच्या दृष्टीने हितकारक असेल अशा खटल्यांचा खर्च करणे .

**ई)** संघटनेच्या विवादातून होणाऱ्या नुकसानीबद्दल सदस्यांना भरपाई देणे .

**उ)** संघटनेतील सदस्याचा मृत्यू झाला, गंभीर आजाराने त्रस्त असेल किंवा अपघात (गंभीर स्वरूपाचा) झाला तर त्याला किंवा त्यांच्या परिवारास संघटनेच्या वतीने सहकार्य म्हणून खर्च करण्यात येईल .

**ऊ)** विभागीय सचिव, सहसचिव यांचे द्वारे केलेल्या खर्चाची देयके राज्य कोषमधून अदा केली जातील . ( जो खर्च करण्यापूर्वी राज्य कार्यकारी मंडळाची परवानगी घेतली आहे, अशाच खर्चाची देयके दिली जातील .

**ऋ)** संघटनेच्या निधीची योग्यप्रकारे वाढ करण्यासाठी निधीची योग्यप्रकारे गुंतवणूक करण्याचा अधिकार राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळास असेल .

❖ **वार्षिक लेखापरीक्षण :-**

संघटनेच्या लेख्यांचे वार्षिक लेखापरीक्षण सक्षम लेखपरीक्षकाकडून करण्यासाठी राज्य पदाधिकारी मंडळ लेखपरीक्षकांची नेमणूक करेल .

| | | |
|---|---|---|
| **श्री. सुनिल भारत वायकर** | **श्री. रामेश्वर नारायण वाघमारे** | **श्री. महेंद्र रमेश भामरे** |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

सर्व जिल्हा कार्यकरणीने आर्थिक वर्षात दिनांक ०१ एप्रिल ते ३१ मार्च पर्यंत केलेल्या जमा व खर्चाचे विवरण आर्थिक वर्ष संपल्यावर दिनांक २० एप्रिल पर्यंत विभागीय सचिवांच्या मार्फत राज्य कोषाध्यक्ष यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील, जेणेकरून संघटनेचा जमा – खर्च अहवाल नियमानुसार विहित कालावधीमध्ये लेख परीक्षकाकडून करून घेता येईल .

संघटनेच्या त्रैमासिक , वार्षिक मीटिंगमध्ये कोणत्याही पदाधिकाऱ्याला संघटनेच्या लेखा पुस्तकांची तपासणी करता येईल .

❖ **<u>संघटनेचे लेटरपॅड</u> :-**

संघटना ही शासन मान्य संघटना असल्यामुळे संघटनेच्या लेटरपॅडचे महत्व अनन्यसाधारण आहे . लेटरपॅडचा योग्य वापर होणे करीता व दुरुपयोग टाळण्याकरीता राज्य संघटना व जिल्हा संघटना यांच्या लेटरपॅडव मध्ये सुसूत्रता असणे आवश्यक आहे. लेटरपॅड कसे असावे , लेटरपॅडवर पदाधिकारी यांची नावे कसे असावेत , लेटरपॅडचा वापर कोणी व कशासाठी करावा , अशा विविध कारणांसाठी एक नियमावली तयार करण्यात येईल व त्यानुसार लेटरपॅडचा वापर करण्यात येईल .

❖ **<u>चर्चेसाठी प्रतिनिधींची निवड</u> :-**

शासनाने संघटनेसोबत , संघटनेच्या मागण्याकरीता किंवा इतर कारणांसाठी चर्चेसाठी आमंत्रित केल्यास व शासनाने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची संख्या येताना निश्चित असा आकडा देऊन काळविल्यास सोबत कोणते पदाधिकारी / सदस्य यांना नियुक्त करावयाचे हे ठरविण्याचा अधिकार राज्य अध्यक्ष व सचिवांना राहील .

❖ **<u>नियमांमध्ये दुरुस्ती करणे</u> :-**

शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून सर्वसाधारण सभेमध्ये सदस्यांच्या बहुमताने कोणत्याही वेळी नियमांमध्ये बदल करता येईल , दुरुस्ती करता येईल. परंतु प्रस्तावित बदलांबाबत सदस्यांना ७ दिवस अगोदर कल्पना देण्यात येईल .

❖ **<u>संघटना विसर्जित करणे</u> :-**

संघटना विसर्जित करण्याकरिता बोलावण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेला उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी तीन चतुर्थांश सदस्यांच्या बहुमताशिवाय संघटना वासर्जित करता येणार नाही . संघटना विसर्जित करण्याचे ठरल्यास संघटनेजवळ असलेला निधी संघटनेच्या सभेनंतर सर्व देणे पूर्ण करून उरलेला निधी सर्वसाधारण सभेच्या परवणगीने विनियोग / खर्च केला जाईल .

## * दाखला *

असे प्रमाणित करण्यात येते की, **"सोसायटी ऑफ अलाईड इमेजिंग अँड रेडिओग्राफर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ",** या संस्थेच्या नियम व नियमावलीची खरी व सत्य प्रत आहे.

स्थळ :- पुणे

दिनांक :- २२/०२/२०२४

| श्री. सुनिल भारत वायकर | श्री. रामेश्वर नारायण वाघमारे | श्री. महेंद्र रमेश भामरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |